ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 8434. Licence No. 53.

वर्ष २० पुणें, बुधवार तारीख १७ नोव्हेंबर, १९५४ अंक ४१

## विविध माहिती

**नर्मदा नदीविषयीं संशोधन**—नर्मदा नदी ज्या भागांतून वहाते त्या भागाची भौगोलिक, सांस्कृतिक व भूगर्भविषयक पहाणी करण्यासाठी गुजरात काँग्रेस सेवा–दलाच्या कार्यकर्त्यांनीं एक कार्यक्रम आंखला आहे. नर्मदा नदीच्या पात्रांतून १४ जणांचें एक मंडळ ह्या कामानिमित्त प्रवास करणार आहे. कार्यकर्त्यांत एंजिनिअर्स, भूस्तरशास्त्रज्ञ, शिक्षक, कलावंत, इत्यादि लोकांचा समावेश करण्यांत आला आहे.

**म्युनिसिपालिटीची मागणी फेटाळली**—येवला गावांत आयात होणारा गूळ, धान्य व इतर माल ह्यांच्यावरील कर कमी करावा अशी विनंति येवला म्युनिसिपालिटीनें व स्थानिक व्यापाऱ्यांनीं मुंबई सरकारला केली होती. परंतु राज्य–सरकारनें ती फेटाळून लावली असें समजतें.

**सोशल वेलफेअर कॉन्फरन्स**—ऑल इंडिआ सोशल वेलफेअर कॉन्फरन्सची बैठक दिल्ली येथें तीन दिवसपर्यंत चालली होती. बैठकीचें उद्घाटन राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांनीं केलें. शहरांतील मध्यमवर्गातील स्त्रियांना फावल्या वेळांत उद्योग पुरवून कुटुंबाचें उत्पन्न कसें वाढवितां येईल ह्यासंबंधीं बैठकींत चर्चा करण्यांत आली. अध्यक्षस्थानीं श्री. दुर्गाबाई देशमुख ह्या होत्या.

**दिल्लींत होणारीं मराठी नाटकें**—दिल्ली येथें होणाऱ्या राष्ट्रीय नाट्य महोत्सवांत 'भाऊबंदकी' आणि 'शारदा' ह्या नाटकांचे प्रयोग होणार आहेत. मराठी नाटकांची निवड करण्यासाठीं न्या. राजाध्यक्ष, श्री. पु. ह. पटवर्धन, श्री. नातू आणि श्री. प्रभाकर माचवे ह्यांची समिति नेमण्यांत आली होती. त्यांनीं ही निवड केली आहे. पहिलें नाटक खाडिलकरांचें व दुसरें देवलांचें आहे.

**विजेच्या ग्राहकांना सूट**—सौराष्ट्र सरकारनें ग्रामोद्योगासाठीं वापरल्या जाणाऱ्या विजेच्या दरांत कपात केली असल्याचें समजतें. जे छोटे ग्रामीण उद्योगधंदे १० अश्वशक्तींपेक्षा अधिक मोटार्स वापरीत नसतील, त्यांनाच ह्या सवलतीच्या दराचा फायदा घेतां येणार आहे.

**विद्यार्थ्यांचा मोकळा वेळ**—नागपूरमधील कॉलेजचे विद्यार्थी फावला वेळ कसा घालवितात ह्यासंबंधी प्रो. रामसिंग ह्यांनीं नुकतीच एक तपासणी केली. १३० विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यांत आल्या. बहुतेक सर्व विद्यार्थी बागांतून फिरणें, रेल्वे स्टेशनवर जाणें, फिरणें व गप्पा ह्या रीतींनीं आपला वेळ घालवीत असल्याचें आढळून आलें. फावला वेळ योग्य रीतीनें घालविण्याच्या योजना नसल्यामुळें आपल्यापेक्षा वयाहून अधिक असलेल्या विद्यार्थ्यांची नक्कल करण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत दिसून आली.

**चंदीगड येथील नव्या इमारती**—पूर्व पंजाबची राजधानी चंदीगड येथें ४ मोठ्या सरकारी इमारती बांधण्यांत येणार असून त्या सर्वांना मिळून ३,६४,९३,००० रुपये खर्च येईल. नव्या इमारती राज्यभवन, हायकोर्ट, सेक्रेटरीएट आणि विधिमंडळाचें सभागृह अशा होणार आहेत. त्यांपैकीं सरकारी कचेऱ्यांच्या इमारतीला सर्वांत जास्त म्हणजे १२९·६७ लाख रुपये खर्च येईल.

**भारतीय बांगड्यासाठीं परदेशी बाजारपेठ**—भारतीय सरकारच्या व्यापार खात्याचे मंत्री, श्री. डी. पी. करमरकर ह्यांनीं आग्र्याजवळ असलेल्या फिरोझाबाद येथील बांगड्यांच्या कारखान्याला नुकतीच भेट दिली. परदेशांत जाणाऱ्या भारतीय महिलांनीं तेथें आपल्या बरोबर चांगल्या बांगड्यांचे नमुने नेऊन ते स्त्रियांना दाखविल्यास बांगड्यांना परदेशांत बाजारपेठा मिळतील असा विश्वास त्यांनीं व्यक्त केला.

**राजस्थानांतील बचतीची प्रगति**—चालू फडणिशी वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत राजस्थान राज्यांत छोट्या बचतीच्या कार्यक्रमानें चांगली प्रगति केली आहे. ह्या काळांत ४० लाख रुपयांची रक्कम गुंतविण्यांत आली. ५० लाख रुपयांच्या बचतीचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. १९५२–५३ सालीं ह्या मोहिमेंत ६ लाख रुपये जमले होते व १९५३–५४ सालीं ३२ लाख रुपये जमले होते.

**रशिअन तंत्रज्ञांचें आगमन**—भारतांत एक नवीन पोलादाचा कारखाना सुरू करण्याची शक्यता अजमावण्यासाठीं रशिअन तंत्रज्ञांचें एक मंडळ लवकरच येणार आहे. रशिअन सरकार कारखान्यासाठीं लागणारी यंत्रसामुग्री आणि तांत्रिक मदत दोन्हीहि पुरविण्यास तयार आहे. रशिअन तज्ज्ञ भारतीय सरकारच्या प्रतिनिधींशीं चर्चा करणार आहेत.

**अहमदनगरसाठीं ड्रेनेजची योजना**—अहमदनगर म्युनिसिपालिटीनें शहराच्या सांडपाण्याची व्यवस्था लावण्यासाठीं भूमिगत ड्रेनेज बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं ९ लाख रुपये खर्च येईल. भारतीय सरकारकडून ४ लाख रुपयांचें कर्ज मागण्याचें ठरविण्यांत आलें आहे. शहरांत कुस्त्यांचा एक आखाडाहि बांधण्यांत येणार आहे.

**भारतीय तंत्रज्ञ कांबोडिआला जाणार?**—सयाममधील कांबोडिआ ह्या राज्याला जरूर लागल्यास भारतीय तंत्रज्ञ व कुशल यंत्रज्ञ पुरविण्याचें पं. नेहरू ह्यांनीं कबूल केलें असल्याचें समजतें. भारत आणि कांबोडिआ ह्यांनीं परस्परांचा अधिक परिचय करून घ्यावा असेंहि मत पंडितजींनीं आपल्या नुकत्याच संपलेल्या दौऱ्यांत व्यक्त केलें आहे.

**जंगल निर्मित मालाचें प्रदर्शन**—पुढील महिन्यांत डेहराडून येथें जंगलापासून निर्माण होऊं शकणाऱ्या वस्तूंचें व मालाचें प्रदर्शन भारतीय सरकारच्या अन्न व शेतकी खात्यातर्फे भरविण्यांत येणार आहे. चौथी जागतिक जंगल परिषद् डेहराडून येथें भरविण्यांत येणार असून तिच्या अनुषंगानें वरील प्रदर्शन उघडण्यांत येणार आहे. प्रदर्शन तीन आठवडे खुलें राहील.

**पार्लमेंटरी सर्व्हिसची योजना**—भारत स्वतंत्र झाल्यापासून आय. ए. एस. सर्व्हिस सुरू करण्यांत आली. राज्य–कारभारासाठी लागणाऱ्या वरिष्ठ प्रतीच्या नोकरांना शिक्षण देऊन तयार करणें असा ह्या सर्व्हिसचा हेतु होता. ह्याच धर्तीवर एक पार्लमेंटरी सर्व्हिस सुरू करण्याचा विचार चालू आहे असें समजतें. कायदेमंडळाच्या कामकाजासाठी लागणारा नोकरवर्ग तयार करण्याचा ह्या सर्व्हिसचा उद्देश आहे.

**हरिजनांसाठी मदत**—भोपाळ सरकारनें हरिजनांच्या आर्थिक उद्धारासाठी १·७५ लाख रुपयांची रक्कम येत्या पांच महिन्यांत खर्च करण्याचें ठरविलें आहे. हरिजनांसाठी ३०० घरें बांधण्याचें ठरविण्यांत आलें असून ह्या कामासाठी वरील रकमेंतून देणग्या आणि कर्जें देण्यांत येणार आहेत. ह्याशिवाय हरिजनांच्या जुन्या घरांची दुरुस्ती करणें व त्यांना ग्रामोद्योगांचे शिक्षण देणें इत्यादि कार्यक्रमहि आंखण्यांत आला आहे.

**पंजाबमधील सहकारी कायदा**—पंजाब सरकारनें राज्यांतील सहकारी संस्थांसंबंधीचा कायदा दुरुस्त करणारें एक बिल आपल्या विधिमंडळांत मांडलें आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

## ॥ तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते ॥ श्रीमत् भगवद्गीता

(१) सिंडिकेटच्या नवीन १००० टनांच्या मशिनरीनें वार्षिक साखरेचें उत्पादन एक लक्ष पोतीं होऊं शकतें हें

## ★ पहिलें शास्त्रप्रमाण ★

(२) एक लक्ष पोतीं साखरेच्या उत्पादनानें खर्चवेंच, व्याजें वजा जातां निव्वळ नफा १० टक्के राहतो हें

## ★ दुसरें शास्त्रप्रमाण ★

सिंडिकेटच्या ठेवींच्या भांडवलाची उभारणी वरीलप्रमाणें "शास्त्रविधानोक्त" झालेली आहे.

ठेवींच्या परतफेडीची आंखलेली योजना : सहा सहा, महिन्यांनीं व्याज व

**दर वर्षी दहा लक्ष रुपयांच्या ठेवींची परत फेड**

मध्यमवर्ग जनतेला इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनप्रमाणें दहा किंवा जास्त वर्षांची मुदत सोयीची नसते, यामुळें ठेवींना कमी मुदत ठेवावी लागते. सवड असते ते नवीन ठेवी देतात. सवड नसते त्यांच्या जुन्या ठेवी परत केल्या जातात, या क्रमानें सर्व ठेवींची परतफेड होऊं शकते. ठेवी सुरक्षित असतात. मध्यमवर्गाला जास्त व्याजाचा फायदा मिळूं शकतो.

मुख्य शास्त्र उत्पादन

## ठेवींच्या व्याजाचे दर

★ मुदत एक वर्ष — व्याज ६ (सहा) टक्के.
★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ (सात) टक्के.
★ मुदत पांच वर्षें — व्याज ७॥ (साडेसात) टक्के.


ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.
दि. १ नोव्हेंबर १९५४

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंट्स्.

# अर्थ

बुधवार, ता. १७ नोव्हेंबर, १९५४


संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पंचवार्षिक योजनेची पहिलीं तीन वर्षे

### खर्च किती झाला व तो कशांतून केला ?

मध्यवर्ती आणि राज्य सरकारांनीं पंचवार्षिक योजनेवर मार्च, १९५४ अखेर संपलेल्या तीन वर्षांत सुमारें ८८५ कोटी रुपये खर्च केला, त्याचा तपशील असा :—

### पंचवार्षिक योजनेवर झालेला खर्च

( आंकडे कोटी रु. चे )

| | १९५१-५२ | १९५२-५३ | १९५३-५४ | एकूण |
|---|---|---|---|---|
| मध्यवर्ती सरकार | १३०.५ | १२६.१ | १८८.३ | ४४४.९ |
| राज्यें | १२९.० | १४३.६ | १६७.३ | ४३९.९ |
| एकूण | २५९.५ | २६९.७ | ३५५.६ | ८८४.८ |

पांच वर्षांत जेवढा खर्च व्हावयाचा, त्याच्या फक्त ४०% एवढाच खर्च तीन वर्षांत झालेला आहे. योजनेला गति मिळण्यास थोडा वेळ लागला; १९५१–५२ मधील खर्च मूळ सरकारी अंदाजपत्रकांतील अंदाजाइतकाच व्हावा, अशीच योजनेंत अपेक्षा होती. १९५२–५३ मध्यें थोडा जास्त खर्च झाला; १९५३ चे मध्यांत खर्चास खऱ्या जोमानें प्रारंभ झाला; त्याची गति आणखीहि वाढणें आवश्यक आहे. ज्या प्रमुख बाबींत खर्च मागें पडला आहे, त्यांचा तपशील पुढें दिला आहे. योजनेचा आराखडा पुरा होण्यास विलंब लागला, कांहीं कार्यक्रम उशीरा हातीं घेतले गेले, कांहींची पूर्व तयारी पुरेशी आगाऊ करण्यांत आली नाहीं. कांहीं आवश्यक सामुग्रीचा अभाव, तंत्रज्ञ मिळण्याची अडचण, यंत्रणा उभारण्यासाठीं लागलेला वेळ, ह्या कारणांमुळें मुख्यतः प्रगतीस जोम लवकर लागला नाहीं. पाणीपुरवठा व धरणें ह्यांचे कार्यक्रम मात्र मागें पडलेले नाहींत. पांच वर्षांत खर्ची पडावयाच्या ६१७ कोटी रुपयांपैकीं ३०० कोटी रु. पहिल्या तीन वर्षांत खर्च झाले, चालू वर्षीच्या खर्चाचा अंदाज १६८ कोटी रु. आहे व पांचव्या वर्षासाठीं १५० कोटी रुपयांचा खर्च शिल्लक राहील. ट्यूब वेल्सच्या कार्यक्रमासहि चांगली गति मिळाली आहे.

पंचवार्षिक योजनेच्या खर्चाची तरतूद कशी करण्यांत आली आहे, हा प्रश्न सहाजीकच महत्त्वाचा आहे.

१९५१–५४ अखेरच्या एकूण खर्चापैकीं ६०% खर्च चालू उत्पन्न-खर्चाच्या मार्गानेंच (म्हणजे चालू उत्पन्नांतून बचत, सरकारी उपक्रमांना झालेला नफा, कर्जें, बचती, कांहीं भांडवली उत्पन्न.) झालेला आहे. परदेशीय मदतीनें १५% खर्च भागविण्यांत आला आहे आणि २५% खर्च रोख शिलका संपवीत आणून, रोखे विकून व अल्प मुदतींचीं कर्जें काढून भागविलेला आहे. हा शेवटचा मार्ग वरचेवर अवलंबविण्याजोगा नाहीं, हें उघडच आहे; अंदाजपत्रकांतील नेहमींच्या तरतुदींतूनच सर्व खर्च भागणें इष्ट आहे

---

## कृत्रिम रीत्या पाऊस पाडण्याचे प्रयत्न

मद्रास राज्य सरकारनें कृत्रिमरीत्या पाऊस पाडण्याचे प्रयत्न करून पाहण्यासाठीं शास्त्रज्ञांची एक कमिटी स्थापन केली आहे. अर्थात् ही कमिटी जे प्रयोग सुचवील अगर करून पाहील त्यांचा उद्देश पाऊस निर्माण करण्याचा नसून ज्या ठिकाणीं पाऊस पडतो तेथें तो अधिक पाडण्यासाठीं प्रयत्न करणें हा आहे. राज्याच्या कांहीं विवक्षित भागांत व कांहीं ठराविक महिन्यांतच हे प्रयोग करण्यांत येणार आहेत. प्रयोगांच्या शक्याशक्यतेची चर्चा करण्यासाठीं राज्यांतील सार्वजनिक बांधकामखात्याचे अधिकारी, विजेच्या कारखान्यांचे अधिकारी व शेती आणि हवामान खात्याचे अधिकारी ह्यांची संयुक्त बैठक भरविण्यांत आली होती. मद्रास राज्यांतील चित्तूर आणि नॉर्थ अरकाट ह्या जिल्ह्यांत अशा प्रकारचे प्रयोग पूर्वीं करण्यांत आले आहेत. त्यांचा थोडाबहुत उपयोग होऊन वरील जिल्ह्यांत सरासरीपेक्षां अधिक पाऊस पाडण्यांत यश आल्याचें समजतें. कृत्रिम पाऊस पाडण्यासाठीं ढग कशा प्रकारचे लागतात, प्रयोगासाठीं कोणती ठिकाणें सोयीचीं आहेत, ढगांवर वर्षाव करण्यासाठीं कोणत्या प्रकारचीं रसायनें जरूर आहेत, इत्यादि बाबींवर बैठकींत विचार-विनिमय करण्यांत आला. एक सूचना करण्यांत आली कीं योग्य त्या प्रकारच्या रसायनानें भरलेले रबरी फुगे ढगांवर सोडण्यांत यावेत. अंतराळांतील ढगांपर्यंत पोंचल्यावर फुगे आपोआप फुटून त्यामधील रसायनांचा ढगांवर वर्षाव करण्यांत यावा. ह्या पद्धतीनें पाऊस अधिक पडेल असा अंदाज करण्यांत आला आहे. हे प्रयोग करून पाहण्यास अधिक नोकर नेमावे लागणार नाहींत असें समजतें. एकूण खर्च सुमारें २०,००० रुपये येईल. अखेरची योजना राज्य-सरकारनें मान्य केल्यावर पुढील महिन्यापासून प्रयोगांना प्रारंभ करण्यांत येणार आहे.

---

## परकीय भांडवलाला दार खुलें केलें

पाकिस्ताननें आपल्या भांडवल गुंतवणुकीविषयींच्या कायद्यांत बरेच मूलग्राही बदल केले असून त्यामुळें परकीय भांडवलाला पाकिस्तानांत चांगलाच वाव मिळणार आहे. देशाचें औद्योगीकरण झपाट्यानें घडवून आणण्यासाठीं वरील कायदे बदलण्यांत आले आहेत. ह्यापूर्वीं कांहीं ठराविक व सरकारनें मान्यता दिलेल्या उद्योगधंद्यांतून ४९ टक्के परकीय भांडवल घेण्याची परवानगी होती. आतां ६० टक्क्यांपर्यंत परकीय भांडवल घेण्याची परवानगी देण्यांत आली आहे. ह्या बदलामुळें परदेशीय भांडवलदारांना त्या उद्योगधंद्यांवर पूर्ण ताबा मिळवितां येईल. परकीय भांडवलाला उत्तेजन देण्यासाठीं पुढीलप्रमाणें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. (१) १ सप्टेंबर १९५४ नंतर पाकिस्तानांत सरकारनें मान्यता दिलेल्या ज्या धंद्यांत परकीय भांडवल गुंतविलें जाईल तें भांडवल मूळच्या देशाला केव्हांहि परत करण्याचा अधिकार सरकारला राहील. (२) परकीय भांडवलाच्या गुंतवणुकीमुळें जो नफा

## कोणत्या कार्यक्रमांवरील खर्च कमी झाला आहे
( आंकडे कोटी रुपयांचे )

| | १९५१-५४ | १९५१-५२ | १९५२-५३ | १९५३-५४ | योजनेचा एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| विकास योजना ... ... | ९·३ | ... | १·४ | ७·९ | ९०·० |
| रेल्वेज... ... ... | ११०·३ | ४०·९ | ३०·२ | ३९·२ | २५०·० |
| उद्योगधंदे ... ... | ३४·१ | १२·३ | १०·० | ११·८ | १७८·१ |
| शिक्षण... ... ... | ६८·७ | १९·३ | २२·१ | २७·५ | १६५·० |
| घरबांधणी ... ... | १०·३ | २·० | ३·३ | ५·० | ४९·० |
| पुनर्वस्ती ... ... | ६२·१ | २६·८ | २०·६ | १४·७ | १२९·७ |

## पहिल्या तीन वर्षांतील खर्चाचा तपशील
( आंकडे कोटी रुपयांचे )

| | १९५१-५२ | १९५२-५३ | १९५३-५४ | १९५१ ५४ एकूण | १९५१-५६ योजना | (४) चे (५) शीं % |
|---|---|---|---|---|---|---|
| शेती, विकास ... ... | २८·९ | २९·६ | ४९·१ | १०७·६ | ३७३·७ | २९ |
| पाणी पुरवठा, वीज ... | ८१·७ | ९७·८ | १२०·६ | ३००·१ | ६१६·८ | ४९ |
| वहातुक, पोस्ट, तार ... | ६७·७ | ६२·१ | ९४·३ | २२४·१ | ५३५·२ | ४२ |
| उद्योगधंदे ... ... | १२·३ | १०·१ | ११·८ | ३४·२ | १७८·१ | १९ |
| समाईक उपयुक्ततेच्या बाबी ... | ६३·५ | ६३·८ | ७१·३ | १९३·६ | ४८९·४ | ४१ |
| इतर ... ... | ५·४ | ६·३ | ८·५ | २०·२ | ५५·० | ३६ |

## पंचवार्षिक योजनेच्या खर्चाची तरतूद
( कोटी रु. )

| | १९५१-५२ | १९५२-५३ | १९५३-५४ | १९५१-५४ एकूण | (४) चें १९५१-५४ मधील खर्चाशीं % |
|---|---|---|---|---|---|
| १ अंदाजपत्रकांतून ... ... | २०४·९ | १४८·१ | १८२·३ | ५३५·३ | ६०·५ |
| ( अ ) सरकारच्या व्यापारी उपक्रमांतून | २२२·० | १२१·२ | ५३·२ | ३४६·४ | ४४·८ |
| ( ब ) कर्जे व लहान बचती ... | (–)१७·१ | २६·९ | १२९·१ | १३८·९ | १५७ |
| २ परदेशांची मदत ... ... | ६४·९० | ४१·० | २५·५ | १३१·४ | १४·९ |
| ३ तात्पुरत्या कर्जांत भर, रोख्यांची विक्री शिलकांचा उपयोग ... | (–)१०·३ | ८०·६ | १४७·८ | २१८·१ | २४·६ |
| एकूण | २५९·५ | २६९·७ | ३५५·६ | ८८४·८ | १००·० |

होईल, त्यापैकीं जितका भाग सरकारमान्य उद्योगधंद्यांत पुन्हा गुंतविला जाईल तितका भाग मूळ भांडवलापैकीं समजून परत करण्याचा हक्कहि सरकारला राहील. एखाद्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आल्यास भांडवलाच्या मालकांना योग्य ती नुकसान-भरपाई देण्यांत येईल. हे मालक परदेशांतील असतील तर त्यांना आपली नुकसानभरपाई आपल्या • देशाला पाठवितां येईल. परकीय भांडवलदारांनीं पाकिस्तानच्या नागरिकांना कारभार-विषयक आणि तांत्रिक नोकऱ्या दिल्या पाहिजेत आणि त्यांना तांत्रिक शिक्षण दिलें पाहिजे अशा अटी घालण्यांत आल्या आहेत. सिमेंट, कोळसा, कापडाच्या व सुताच्या गिरण्या, डबा–बंद मासे, विजेचे कारखाने, रासायनिक कारखाने, साखरेचे कारखाने, जहाजे बांधण्याचे कारखाने, इत्यादि १३ प्रकारच्या धंद्यांतून ४९ टक्के परकीय भांडवल गुंतविण्याची परवानगी परवापर्यंत होती.


# अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—गुगभाट, ठाकूरद्वार, दादर, कोट, परळ

— दृ. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —


### अन्नपदार्थांचें जागतिक प्रदर्शन

पुढील वर्षाच्या फेब्रुआरी महिन्यांत दिल्ली येथें खाण्याच्या जिनसांचें एक जागतिक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. भारतांत भरविलें जाणारें अशा तऱ्हेचें हें पहिलेंच प्रदर्शन आहे. अखिल भारतीय महिला संघटनेच्या अध्यक्ष, श्रीमती लीलावती मुनशी ह्या उपक्रमाची तयारी करीत आहेत.


# महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें.

नं. १० बी. जे रोड, पुणें–१

या विद्यालयाचा पुढील वर्ग दि. ३ जानेवारी १९५५ रोजीं सुरू होईल.

विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असिस्टंट को-ऑप. ऑफिसर, खरेदी–विक्री संघ व विविध कार्यकारी संस्थांचे सेक्रेटरी या दर्जाचे नोकरवर्गांना शिक्षण दिलें जातें.

विद्यालयाचा शिक्षणक्रम आठ महिने मुदतीचा आहे. प्रवेश देतांना सहकारी सोसायट्या व सहकारी खात्यामध्यें नोकरी करणाऱ्यांना अधिक पसंति दिली जाते. बाहेरील विद्यार्थी कमींतकमी एस. एस. सी. झाले असले पाहिजेत. सोसायटींत काम करणारे विद्यार्थी एस. एस. सी. उत्तीर्ण नसल्यास त्यांनीं संस्थेंत कमींतकमी तीन वर्षे नोकरी केली असली पाहिजे.

वरीलप्रमाणें शैक्षणिक लायकी असल्यास स्त्रियांनाहि प्रवेश देण्यांत येईल.

अर्जाचे फॉर्म व माहितीपत्रकें विद्यालयांत ११ ते ५ चे दरम्यान मिळूं शकतील. अर्ज विद्यालयांत दि. १५ डिसेंबर १९५४ पूर्वी पोहोचले पाहिजेत. - अधिक माहितीसाठीं लिहा.

सुपरिंटेन्डेंट,
महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें.

## इंटरनॅशनल बँकेनें दिलेलीं कर्जें

( १९४७ ते ३१ जुलै, १९५४ अखेरचे आकडे: दशलक्ष अमेरिकन डॉलर्स )

| देश | एकूण मंजूर कर्ज | पैकीं प्रत्यक्ष उचललेलें कर्ज |
|---|---|---|
| ऑस्ट्रेलिया | २०४·० | १५८·० |
| ऑस्ट्रिया | १२·० | — |
| बेल्जम | ८६·० | ८४·८ |
| ब्राझील | १९४·१ | १२७·४ |
| सिलोन | १९·१ | — |
| चिली | ३७·३ | १६·७ |
| कोलंबिया | ६९·३२ | ३६·९ |
| डेन्मार्क | ४०·० | ४०·० |
| इकेडॉर | ८·५ | — |
| एल साल्वेडॉर | १२·५ | १२·३ |
| एथिओपिया | ८·५ | ६·१ |
| फिनलंड | ३८·१ | ३०·७ |
| फ्रान्स | २५७·५ | २५०·० |
| आयर्लंड | ५·९ | ५·५ |
| इंडिया | १००·५२ | ५५·९ |
| इराक | १२·८ | ६·१ |
| इटली | २०·० | १८·२ |
| जपान | ४०·२ | ८·२ |
| लक्झेंबर्ग | ११·८ | ११·८ |
| मेक्सिको | ८०·३ | ६२·६ |
| नेदरलंडस् | २२१·५ | २२१·५ |
| निकाराग्वे | ९·२ | ५·० |
| नॉर्वे | २५·० | १५·० |
| पाकिस्तान | ४४·४ | १४·४ |
| पनामा | १·५ | ·३ |
| पॅरॅग्वे | ५·० | १·७ |
| पेरू | ५·५ | ३·६ |
| थायलँड | २५·४ | २२·० |
| टर्की | ६३·४ | २२·७ |
| द. आफ्रिका | ११०·० | ९३·७ |
| उ. ऱ्होडेशिया | १४·० | १२·७ |
| द. ऱ्होडेशिया | २८·० | २१·० |
| युरॅग्वे | ३३·० | २६·२ |
| युगोस्लाव्हिआ | ६०·७ | ४७·४ |
| एकूण | १,९०५·० | १,४३८·४ |

### भारतामधील रेडिओंच्या संख्येंत वाढ

भारत स्वतंत्र झाल्यापासूनच्या काळांत रेडिओंच्या संख्येंत सालोसाल पुढीलप्रमाणें वाढ झाली.

| वर्ष | रेडिओंची संख्या |
|---|---|
| १९४७ | २,७५,९५५ |
| १९४८ | ३,१८,९९० |
| १९४९ | ४,०८,०६० |
| १९५० | ५,४६,३१९ |
| १९५१ | ६,८५,५०८ |
| १९५२ | ७,५८,६२० |
| १९५३ | ८,३७,७४९ |


# बँक ऑफ पूना लि.

( शेडयूल्ड बँक )

अधिकृत भांडवल रु. ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें रु. २५,००,०००
वसूल रु. १२,५०,०००

मुख्य कचेरी :—४५५ रविवार, पुणें
शाखाः—(१) सदाशिव पेठ, पुणें १
(२) भवानी पेठ, पुणें २.
(३) सोलापूर (४) सांगली

पुणें व सांगली येथें सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय.
बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात

जी. जी. साठे — मॅनेजर
डी. आर. नाईक जे. पी. — चेअरमन

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

अधिकृत भांडवल रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल रु. ५,००,०००
वसूल भांडवल रु. २,५०,०००
गंगाजळी व इतर फंडस् रु. ७१,६००

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स


श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.
पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन्. व्ही. पांडव, मॅनेजर

# किर्लोस्कर पॉवरवर चालणारा 'शरद' चरक

हा चरक चालविण्यास ८।१७ हॉ. पॉ. एंजिन लागते. दरेक तासास १२०० ते १५०० पौंड ऊंस गाळला जातो. याशिवाय बैलावर चालणारे कमाल, करामत व पॉवरवर चालणारे



कोयना, वसंत, वगैरे चरक आहेत. पसंतीप्रमाणें निवड करा.

—सविस्तर माहितीसाठीं लिहा.—

**किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.**



# कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

पृ. सं. १६८ ★ किंमत २॥ रु.

" आपल्या लेखांत दैनंदिन जीवनांतील साध्या साध्या गोष्टी घेऊन, त्यांतून महाराष्ट्राचे एक प्रसिद्ध विचारवंत लेखक श्री. श्री. वा. काळे ह्यांनीं सुखी जीवनाची किल्लीच जणुं काय प्रत्येकाच्या हातांत दिली आहे "

ग. वा. मावळंकर
लोकसभेचे अध्यक्ष

( " कण आणि क्षण " च्या गुजराती आवृत्तीच्या प्रस्तावनेंतील उतारा. )



स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५३ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,९९,००० |
| ठेवी | रु. | ७२,६८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



# 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



म्यूच्युअल कंपन्यांत सर्वात अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी ! !

# दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७
हयातीनंतरच्या विम्यास: " " " रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर



# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

१२५ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.

* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार—SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर

## भारतांतील कांहीं मोठ्या बँका

### अलाहाबाद बँक लि.

दि अलाहाबाद बँक लि. ही भारतांतील एक अत्यंत जुनी बँक आहे. तिची स्थापना १८६५ सालीं झाली. तिची मुख्य कचेरी प्रथम अलाहाबाद येथें होती. ती पी. अँड ओ. बँकिंग कॉर्पोरेशनशी जोडली गेली व ती पुनः चार्टर्ड बँक ऑफ इंडियाशीं संलग्न झाली व तिची मुख्य कचेरी कलकत्ता येथें गेली. ब्रँच बँकिंग व उत्पादित मालतारणावर कर्जे, हीं बँकेचीं वैशिष्ट्यें आहेत. बँकेचा ताळेबंद ३४ कोटी, २० लक्ष रुपयांचा असून डिव्हिडंडचा दर १२ + ६ = १८% इतका आहे.

### आंध्र बँक लि.

आंध्र बँक लि. ची स्थापना मसुलिपट्टम् येथें १९२३ मध्यें झाली बँकेचा ताळेबंद ६ कोटी, ८३ लक्ष रुपयांचा असून डिव्हिडंड ६½% आहे.

### बँक ऑफ बरोडा लि.

बडोयाच्या महाराजांच्या सरकारच्या आश्रयाखाली ही बँक १९०८ मध्यें स्थापन झाली व वाढली. बँकेचा ताळेबंद ३८ कोटी रुपयांचा असून डिव्हिडंड १२% आहे.

### बँक ऑफ बिकानेर लि.

ही बँक १९४४ मध्यें निघाली. ताळेबंद १३ कोटी रुपयांचा असून डिव्हिडंड ३% आहे.

### बँक ऑफ इंडिया लि.

१९०६ सालीं ही बँक स्थापन झाली. तिच्या ४० शाखांपैकी ८ शाखा भारताबाहेर आहेत. बँकेचा ताळेबंद ६८ कोटी, ७२ लक्ष रुपयांचा असून डिव्हिडंड १४% आहे.

### बँक ऑफ जयपूर लि.

१९४७ सालीं स्थापन झालेली ही बँक राजस्थान सरकारची बँकर आहे. बँकेचा ताळेबंद ८ कोटी रुपयांचा असून डिव्हिडंडचा दर ३% आहे.

### बँक ऑफ म्हैसूर लि.

१९१३ मध्यें ही बँक स्थापन झाली. ११ कोटी, ५८ लक्ष रुपये खेळतें भांडवलावर ती १६% डिव्हिडंड देत आहे.

### बँक ऑफ राजस्थान लि.

उदेपूर येथें ही बँक १९४३ मध्यें स्थापन झाली. तिचें खेळतें भांडवल २ कोटी, ९ लक्ष रु. आहे.

### बरेली कॉर्पोरेशन बँक लि.

बरेली येथें ही बँक स्थापन झाली. तिचा ताळेबंद १ कोटी, ३० लक्ष रुपयांचा आहे.

### कॅनरा बँक लि.

ही बँक १९०६ मध्यें स्थापन झाली. तिची नोंदलेली कचेरी मंगलोर येथें असली, तरी कारभाराचीं मुख्य खातीं बंगलोर येथें ठेवण्याची तिनें रिझर्व्ह बँकेकडून परवानगी मिळविली आहे. बँकेनें "फॉरेन खातें" सुरू केलें आहे. बँकेचा ताळेबंद १० कोटी, ४५ लक्ष रुपयांचा असून डिव्हिडंडचा दर ९% आहे.

### कॅनरा इंडस्ट्रिअल अँड बँकिंग सिंडिकेट लि.

ही बँक १९२५ मध्यें स्थापन झाली. दक्षिण कॅनरा जिल्ह्यांत तिच्या २४ शाखा आहेत. बँकेच्या बचतीच्या "पिग्मी" योजना प्रसिद्ध आहेत. बँकेचा डिव्हिडंडचा दर ९% आहे.

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

देशी बँकांतील ही सर्वांत मोठी बँक १९११ मध्यें स्थापन झाली. १९२३ मध्यें ती युनियन बँकेची चालक झाली व टाटा इंडस्ट्रीअल बँक तिनें घेतली. बँकेचें खेळतें भांडवल १४३ कोटी, ४८ लक्ष रु. आहे.

### देवकरण नानजी बँकिंग लि.

१९३८ मध्यें ही बँक सुरू झाली. तिचें खेळतें भांडवल १२ कोटी, ९६ लक्ष रुपये झालें आहे. डिव्हिडंडचा दर ४% आहे.

### हिंद बँक लि.

कलकत्ता येथें हिंद बँकेची स्थापना १९४३ मध्यें झाली. तिचें खेळतें भांडवल ७ कोटी, ६२ लक्ष रु. असून डिव्हिडंडचा दर ३% आहे.

### हिंदुस्थान मर्कंटाइल बँक लि.

१९४४ सालीं ही बँक निघाली. खेळतें भांडवल ३ कोटी, ३७ लक्ष रु. आहे.

### हैदराबाद स्टेट बँक लि.

हैदराबाद स्टेट बँक १९४१ मध्यें स्थापन झाली. तिचा ताळेबंद १८ कोटी, ५८ लक्ष रुपयांचा असून डिव्हिडंडचा दर ५% आहे.

### इंडियन बँक लि.

मद्रास येथें ह्या बँकेची मुख्य कचेरी आहे. तिच्या ४५ शाखा व ३० उपशाखा आहेत. खेळतें भांडवल २७ कोटी रु. असून डिव्हिडंड १२% आहे.

### इंडियन ओव्हरसीज बँक लि.

मद्रास येथें ही बँक १९३७ मध्यें स्थापन झाली. तिचें खेळतें भांडवल १६ कोटी रु. असून डिव्हिडंड ६% आहे.

### इंपीरिअल बँक ऑफ इंडिया

तीन प्रेसिडेन्सी बँकांच्या एकत्रीकरणांतून ही बँक १९२० मध्यें स्थापन झाली. ती रिझर्व्ह बँकेची एजंट म्हणून ट्रेझरींचा व्यवहार पहाते. तिचा ताळेबंद २२४ कोटी रु.चा असून डिव्हिडंडचा दर १६% आहे.

### पलाई सेंट्रल बँक लि.

१९२७ मध्यें ही बँक स्थापन झाली. खेडेगावांतहि जाऊन ह्या बँकेनें भांडवलाचा पुरवठा केला आहे. बँकेचें खेळतें भांडवल ५ कोटी, ५९ लक्ष रु. आहे.

### पंजाब नॅशनल बँक लि.

१८९५ सालीं ही बँक लाहोर येथें स्थापन झाली. तिची कचेरी दिल्ली येथें १९४७ मध्यें हलविण्यांत आली. बँकेचें खेळतें भांडवल ८० कोटी रु. असून डिव्हिडंडचा दर ८% आहे.

### त्रावणकोर बँक लि.

त्रिवेंद्रम येथें १९४५ मध्यें ही बँक निघाली. तिचें खेळतें भांडवल ५ कोटी, ६० लक्ष रु. असून डिव्हिडंडचा दर २½% आहे.

### युनायटेड कमर्शिअल बँक लि.

११ वर्षांपूर्वीच ही बँक स्थापन झाली, पण तिच्या आतां ७ देशांत ९० शाखा पसरल्या आहेत. फॉरिन बँकिंगमध्यें तिनें विशेष प्रगति केली आहे. तिचें खेळतें भांडवल ५८ कोटी रु. असून डिव्हिडंड ३% आहे.

### सिंद्री येथील खताच्या कारखान्याचें उत्पादन

सिंद्री येथें उभारण्यांत आलेला खताचा कारखाना आशिआखंडांत सर्वांत मोठा आहे. ह्या कारखान्याचें उत्पादन गेल्या कांहीं दिवसांत एकसारखें वाढत चाललें आहे. गेल्या महिन्यांत कारखान्यांत ३०,००० टन अमोनिअम सल्फेट तयार झालें. दररोज सुमारें ९६० टन खत निर्माण करण्याची कारखान्याची शक्ती आहे. पण ऑक्टोबरमधील दररोजच्या उत्पादनाची सरासरी ९६८ टन पडली. कारखान्यांत प्रत्यक्ष उत्पादनाला प्रारंभ ३१ ऑक्टोबर, १९५० ह्या दिवशीं झाला. तेव्हांपासून आतांपर्यंत एका महिन्यांत इतकें उत्पादन कधींच झालें नव्हतें. कारखान्याच्या इतर खतांच्या उत्पादनांतहि अशीच वाढ होत आहे. गेल्या महिन्यांत आतांपर्यंत सर्वांत जास्त म्हणजे ८,०३६ टन अमोनिआ निर्माण करण्यांत आला. अमोनिआच्या उत्पादनाची दैनिक सरासरी २५९ टन पडली. दररोज सुमारें २७० टन अमोनिआ उत्पादन करण्याची कारखान्याची पात्रता आहे. कोक निर्माण करण्याची एक भट्टी नुकतीच चालू करण्यांत आली आहे. भट्टीच्या साहचानें रोज ६०० टन कोक निर्माण करता येईल अशी अपेक्षा होती. पण प्रत्यक्ष उत्पादन अपेक्षेपेक्षाहि अधिक झालें. नोव्हेंबर ४ तारखेला अमोनिअम सल्फेटच्या उत्पादनांतहि त्या कालांत उच्चांक गाठण्यांत आला. नोव्हेंबर ४ तारखेपासून ते ८ तारखेपर्यंतच्या पांच दिवसांत दररोज १,००० टनापेक्षा अधिक अमोनिअम सल्फेटचें उत्पादन करण्यांत आलें. नोव्हेंबरच्या ५ तारखेला तर १११५ टन खताचें उत्पादन करण्यांत आलें. सिंद्री येथील खताच्या कारखान्यांत २३ कोटी रुपयांचें भांडवल गुंतलेलें आहे.

---

दि पूना हिंदू मिडल क्लास को. ऑप. हाउसिंग सोसायटी नं. २ लि.

( १२०६ अ/९ शिवाजीनगर, पुणें ४. )

वरील सोसायटी ता. २३-५-१९३० रोजीं स्थापन झाली व तिचे आज ४३ सभासद आहेत. पैकीं ४२ बंगले तयार असून सोसायटी स्वतःची एक इमारत लौकरच बांधणार आहे. सोसायटीनें अत्यंत स्वस्त दरांत-रु. २०० ते ४५० पर्यंत जामिनीची किंमत घेऊन वरील ४३ सभासदांची कायम भाडेपट्टयाच्या पद्धतीवर सोय केली आहे. सोसायटीचे वसूल भांडवल रु. २१५०० व रिझर्व्ह व इतर फंड मिळून रु. १०,००० आहे. मेलीं दोन वर्षें ६% भागावरील नफा देण्यांत आला. सभासदांचीं कर्जें सुमारें ७० हजार रु.

१९५४-५५ चें कार्यकारी मंडळ

१ श्री. दि. अ. सोनटक्के अध्यक्ष. २ श्री. दा. वि. भोंडे कार्याध्यक्ष ३ श्री. म. चिं. पळशीकर, ( ४ ) र. ग. पळशीकर, ५ श्री. रा. ग. देव, ६ श्री. गो. चिं अनगळ, ७ श्री. ना कृ. कालगांवकर, ८ श्री. स. वा. जोशी, ९ श्री. गं. दा. नेऊरगांवकर, व १० श्री. प्र. न. केसकर, (कार्यवाह) मुदतीच्या ठेवी-सोसायटी कमींत कमी ३ वर्षें मुदतीच्या ठेवी ६% व्याजाच्या दरानें स्वीकारते.

### मद्रास राज्यांतील वीजयोजना

मद्रास राज्यांतील ग्रामीण विभागांत वीज खेळविणाऱ्या १६ योजना नुकत्याच मंजूर करण्यांत आल्या. सर्व योजनांना मिळून ६० लाख रुपये खर्च येईल. १९५४-५५ च्या पुरवणी-अंदाजपत्रकांत ह्या खर्चाची तरतूद करण्यांत येणार आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई
शेअर भांडवल व रिझर्व रु. १३ ३२,८००
ठेवी .... .... .... रु. १,२२,२५,३००
एकूण खेळतें भांडवल रु. १,४३,६२,९००
शाखा:- बँकेचे सर्व व्यवहार केले जातात शाखा:-
दादर बेळगांव
माहीम पुणें

स्थापना १९१८

### रशिआजवळ शीघ्र गतीचीं विमानें

अमेरिकेच्या नाविक खात्याचे चिटणीस मि. चार्लस थॉमस ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं, रशिआजवळ आवाजापेक्षा शीघ्र गतीनें जाणारीं बॉंबफेकी विमानें आहेत. रशियाजवळ अशा प्रकारचीं विमानें असल्याबद्दल अमेरिकन सरकारच्या अधिकाऱ्यानें केलेलें हें पहिलेंच विधान आहे. समुद्रसपाटीवर आवजाची गति दर तासाला ७९८ मैल असते.

### पन्ना येथील हिऱ्याच्या खाणी

पन्ना येथील हिऱ्याच्या खाणींची भूस्तरविषयक पहाणी करण्यासाठी तीन रशिअन तज्ज्ञ भारतांत आले होते. त्यांनीं आपला अहवाल पुरा केला आहे. त्यांच्या मतानें, खाणींत जरूर ती यंत्रसामुग्री बसविण्यांत आल्यावर हिऱ्यांचें वार्षिक उत्पादन सुमारें १२ कोटी रुपयांपर्यंत जाऊं शकेल. पन्ना येथील खाणी विंध्य प्रदेशांत ७२५ चौरस मैलभर पसरलेल्या आहेत.

### जबलपूर जवळ नवीन शेतकी-कॉलेज

जबलपूरपासून ५ मैलांवर असलेल्या एका गांवीं नवीन शेतकी कॉलेज काढण्यांत येणार आहे. कॉलेजसाठी निवडण्यांत आलेल्या जागेची पहाणी मध्य प्रदेश सरकारच्या शेतीमंत्र्यांनीं नुकतीच केली. पुढील शैक्षणिक वर्षापासून कॉलेज सुरू होईल. कॉलेजला जोडूनच एक नमुनेदार दुग्धालय काढण्यांत येणार आहे.

### सरकारी हुकुमाचा परिणाम

भारतीय सरकारनें गेल्या वर्षी असा हुकूम काढला होता कीं, ज्या मिठांत ९४ टक्के 'सोडिअम क्लोराइड' असेल तेंच बाजारांत विक्रीसाठी योग्य ठरविलें जाईल. ह्या हुकुमामुळें मिठागरांत काम करणारे १०,००० लोक बेकार होतील, अशी भीति मीठ-कामगार युनिअनच्या चिटणिसांनीं व्यक्त केली आहे. वरील हुकुमामुळें तयार मिठाचा पुष्कळसा सांठा पडून असल्याचेंहि त्यांनीं सांगितलें.

### सीलोनमधील लोकसंख्येचा तपशील

भारत व सीलोन ह्यांच्या दरम्यान सीलोनमधील भारतीयांच्या भवितव्याबद्दल वाद चालू आहे. सीलोनची एकूण लोकसंख्या सुमारें ७० लाख आहे. ह्या संख्येंत ७ लाख सीलोन-तामिळी, १८,००० मॅले, ११,००० युरोपिअन्स आणि ९ लाख हिंदी आहेत. त्याशिवाय सिंहली, कॅंडिअन व इतर कांहीं वंशांचेहि लोक आहेत.

### जुन्या पोस्टाच्या तिकिटाची किंमत

१८५४ मध्यें काढण्यांत आलेलें पोस्टाचें एक तिकीट लंडनमधील लिलांवांत न्युझिलंडच्या एका महिलेनें विकत घेतलें. ह्या तिकिटासाठी तिला ७२५ पौंड मोजावे लागले. तिकिटावर व्हिक्टोरिआ राणीचा मुखवटा उलटा छापलेला आहे.

---

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.